# दुकानदार आणि अकाउंटंट

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

आल्पस्च्या पर्वतीय प्रदेशात कुठेतरी, एका उंच पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या वक्राकार खोऱ्यात एक छोटेसे गाव वसले होते. आणि त्या गावाच्या बरोबर मध्यभागी एक दुकान होते. ते दुकान एका जनरल स्टोअरप्रमाणे होते, जिथे खाद्यपदार्थांपासून ते साबणापर्यंत आणि मऊ लोकरीच्या हातमोज्यांपासून ते टोप्यांपर्यंत सर्व काही मिळत असे. त्या गावात राहणाऱ्या लोकांना हे दुकान खूपच आवडत असे. रोज सकाळी ते ताजा ब्रेड आणि दिवसभराच्या स्वयंपाकासाठी लागणारे जिन्नस घेण्यासाठी दुकानात येत. दुपारीही ते दुकानात येत आणि घरात संपायला आलेल्या वस्तू घेऊन जात — मेणबत्त्या, दोरे, सर्दी-पडशासाठी काही आयुर्वेदिक औषधे इ. रात्रीसुद्धा ते त्या दुकानात डोकावत आणि दुकानाच्या परिसरात गर्दी करणाऱ्या लोकांना ख्यालीखुशाली विचारत असत. ते एक दुकान होते, ती एक भेटण्याची जागा होती, ते एक मध्यवर्ती स्थान आणि सर्वांसाठी ते एक प्रकारे घरच होते.

ते दुकान एक दांपत्य म्हणजेच पती-पत्नी चालवत, ज्यांना ते दुकान त्यांच्या कुटुंबियांकडून लग्नानंतर लगेचच वारसाहक्काने मिळाले होते. त्यांची नावे होती हॅन्स व फ्रीडा आणि गावकऱ्यांना ते अतिशय प्रिय होते. त्या दोघांचे विनम्र डोळे आणि साधा व्यवहार हे त्या दुकानाचा तितकेच अभिन्न भाग होते, जितके त्या दुकानातील लाकडाच्या तिरप्या वळचणी आणि जमिनीपासून ते छतापर्यंत असलेली उंच कपाटे होती.

हॅन्स आणि फ्रीडा यांचा त्यांच्या कामावर फार जीव होता. तो त्यांचा ध्यास होता, ज्या समाजाचे ते घटक होते, त्या समाजासाठी योगदान देण्याची ही त्यांची पद्धत होती. आणि त्यांची कमाई जरी फार जास्त नव्हती, तरी पण तक्रार करण्याचे कारण त्यांना कधी सापडलेच नाही. प्रत्येक आठवड्याच्या शेवटी आपल्या जमाखर्चाच्या ताळमेळाची नोंद ते एका मोठ्या चर्मवेष्टीत वहीत करीत, ज्या वहीची पाने जाडजुड, चामड्यासारखी होती व त्या पानांच्या कडा दुमडल्या गेलेल्या होत्या. त्यांना ज्याची

गरज होती ते सर्व काही त्यांना मिळाले होते. ते त्यांच्या लहान मुलाचे पालनपोषण करू शकत होते आणि आपले जीवन आरामात जगू शकत होते.

अशा प्रकारे, दहा, वीस, पंचवीस वर्षे उलटली. त्या गावातील जीवनमान जरी पुढे सरकत राहिले होते, तरी त्या दुकानाचा बराचसा भाग मात्र जसा होता तसाच राहिला, एका शाश्वत उपस्थितीच्या स्मृतीचिन्हाप्रमाणे. दररोज सकाळी ते दुकान उघडत असे आणि संध्याकाळी ते बंद होत असे. लोक गर्दीने दुकानात येत आणि बाहेर पडत. वर्षागणिक जमाखर्चाच्या वहीवरचे चामडे मात्र जुने आणि नरम होत गेले, त्यावर लालसर-करड्या रंगाचे ठिपके उमटू लागले.

या कालावधीत या दांपत्याचा मुलगा, एन्द्रिअसदेखील आता मोठा झाला होता. गावाबाहेरील जगाविषयीची माहिती करून घेण्यास उत्सुक असल्यामुळे एन्द्रिअसने पुढील शिक्षणासाठी आपला मुक्काम गावापासून काही शहरे सोडून पलीकडे असलेल्या एका शहरात हलवला. तिथे त्याची ओळख नवीन संकल्पनांशी, नवीन दृष्टीकोनांशी आणि कार्य करण्याच्या अधिक प्रगत व अधिक परिणामकारक पद्धतींशी झाली. तो वेळोवेळी याविषयी विचार करत असे की, तो जे काही शिकतो आहे त्यातील काही ज्ञान त्याला आपल्या पालकांच्या व्यवसायात कशा रीतीने लागू करता येईल आणि त्यांचे दुकान ते त्यांच्या ग्राहकांसाठी अधिक जास्त आकर्षक कसे बनवू शकतील.

एन्द्रिअस आपल्या पालकांना भेटण्यासाठी घरी आलेला असताना एके दिवशी संध्याकाळी, तो त्या टेबलाजवळ बसला जिथे त्याचे वडील त्यांची दिवसभराची मिळकत मोजत होते. त्याला तेच ते ओळखीचे दृश्य पाहावयास मिळाले : छतासाठी लावलेल्या लाकडाच्या वळचणींचा कुबट तेलकट दर्प, कपाटांच्या कप्प्यांमध्ये तुडुंब भरलेली निरनिराळ्या सामानाची सरमिसळ.

“बाबा?” काही वेळानंतर तो म्हणाला.

“काय बेटा?” हॅन्स म्हणाले. ते त्यांच्या समोर असलेल्या नोटांच्या गड्ड्यांकडे आणि नाण्यांच्या ढीगाकडे डोळे बारीक करून पाहत होते, चष्मा त्यांच्या नाकावर टेकवलेला होता.

“तुम्ही कधीतरी . . . इथे थोडा फेरबदल करण्यासंबंधी कधी विचार केला आहे का?”

“बदल?” हॅन्स यांचे त्याच्या बोलण्याकडे अर्धवट लक्ष होते.

“होय. म्हणजे, तुम्ही गैरसमज करून घेऊ नका. तुम्ही या जागेसाठी जे काही केलेत, ते उत्तमच आहे. सर्वांना हे दुकान फारच आवडते. मला फक्त असे वाटते की, आपण काही गोष्टी थोड्याफार प्रमाणात आणखी आकर्षक करू शकतो. त्यांची मांडणी थोड्या अधिक व्यवस्थित पद्धतीने करू शकतो.”

हॅन्स यांनी आपला चष्मा काढला आणि मुलाकडे पाहिले.

“काय चालले आहे तुझ्या मनात?”

“अच्छा, पाहा बरं जरा तुम्ही पैसे कसे मोजत आहात त्याकडे. तुम्ही तीच वही अजूनही वापरत आहात, जी मी लहान असतानाही तुम्ही वापरत होतात.” एन्ड्रिअसने जमाखर्चाची ती वही स्वतःच्या दिशेला ओढली. ती वही कागदांनी गच्च भरलेली होती. आणि त्या वहीची बांधणी सुटत चालली होती. त्या वहीच्या प्रत्येक पानावर छोट्या-छोट्या अस्पष्ट अक्षरात मागील अनेक वर्षांच्या मिळकतीचा हिशोब लिहिलेला होता.

“पाहा?” मुलगा म्हणाला. “ही वही वाचता येणेदेखील कठीण आहे, ती वापरणे तर फारच दूरची गोष्ट आहे. या जमाखर्चाच्या वहीवरून खरंच तुम्ही सांगू शकाल का की, दुकानाचा कारभार कसा चालला आहे? व्यापारात ज्या पद्धतीने वाढ व्हायला हवी तशी ती जर होत नसेल, तर भविष्यात आपला टिकाव लागू शकतो किंवा नाही हे तुम्हाला कसे कळेल?”

त्याच्या वडलांनी भुवया उंचावल्या. मिळकतीचा आणि खर्चांचा ताळमेळ बसवण्याच्या त्यांच्या साध्या पद्धती आतापर्यंतच्या वर्षांमध्ये पुरतेपणाने यशस्वी ठरत आल्या होत्या. पण, त्यांनी विचार केला की, कदाचित त्यांचा मुलगा जे सांगतो आहे त्यात काहीतरी तथ्य आहे. पंचवीस वर्षे होऊन गेली होती. कदाचित नव्या गोष्टींची माहिती करून घेण्याची वेळ आता आली होती.

“तर मग, आपण काय करावे असे तुला वाटते बेटा?”

“माझ्या ओळखीचे एक अकाउंटंट आहेत जे शेजारच्याच गावात राहतात. मी त्यांना आपला आर्थिक ताळेबंद नजरेखाली घालण्यास सांगतो.”

त्यानंतर काही दिवसांनी दुकानाच्या दरवाज्यावर थाप पडली. एक बुटका, स्थूल माणूस आत आला; त्याने किमती काळा सूट घातला होता, ज्याची कॉलर कडक होती व तिला स्टार्च केलेले होते आणि त्याने चपटी, उंचवटा नसलेली टोपी घातलेली होती. “नमस्कार, माझे नाव हेरी इम्होफ आहे आणि मी अकाउंटंट आहे!” त्याने लक्ष वेधून घेण्याच्या आविर्भावात आपली टोपी उतरवली.

हॅन्स, जे जवळपासच्या कपाटांमध्ये सामान रचत होते त्यांनी या हेरी इम्होफचे स्वागत केले. हॅन्स त्याला दुकान दाखवत असताना तो माणूस विक्रीसाठी ठेवलेल्या विविध वस्तू निरखत होता, त्यातील काही वस्तू उचलून पाहत असताना अधूनमधून तो, “हूँऽ” किंवा “आह” किंवा “ओहो” असे आवाज काढत होता. त्या आवाजांचा अर्थ काय लावायचा हे जरी हॅन्स यांना कळत नव्हते, तरीही ते नेहमीप्रमाणे विनम्रच राहिले, जिथे जमाखर्चाची वही आणि बिले ठेवली होती त्या टेबलकडे हेरी इम्होफला घेऊन जाताना व त्याला चहाचा कप देतानाही.

हेरी इम्होफने तुसडेपणाने आपल्या मानेला हिसका दिला. त्याने डोक्यावरून आपली टोपी काढण्याऐवजी आपले पेन आणि आपली व्यवस्थित वेष्टन घातलेली नोटबुक बाहेर काढली आणि कामाला सुरुवात केली.

काही तासांनंतर, तो उभा राहिला व त्याने आपली टोपी पुन्हा स्वतःच्या डोक्यावर घातली. “ठीक आहे, काम बरेच करावे लागणार आहे. बरीचशी मोजणी आणि पडताळणी पुन्हा करावी लागेल, पण ते करायला मी सुरुवात केली आहे. मी उद्या पुन्हा परत येईन.”

मग तो पुन्हा दुसऱ्या दिवशी तिथे हजर झाला. आणि मग पुन्हा त्याच्या दुसऱ्या दिवशी आणि त्यानंतरच्या दुसऱ्या दिवशीही तो पुन्हा तिथे आला. काही काळ असेच सुरू राहिले, हेरी इम्होफचे सकाळी येत राहणे, कुरकुर करत किंवा नापसंतीने कपाळावर आठ्या पाडून दुकानाचे निरीक्षण करत राहणे आणि मग दुपारपर्यंत वह्या अगदी काटेकोरपणे तपासत राहणे.

हे सर्व असेच सुरू असताना काही आठवडे उलटले आणि मग एके दिवशी फ्रीडाच्या असे लक्षात आले की, तिचे पती काहीशा चमत्कारिक रीतीने गप्प-गप्प राहू लागले आहेत. तो अतिशय सुंदर दिवस होता, ऊबदार, भरपूर सूर्यप्रकाश दुकानाच्या खिडक्यांमधून आत येत होता. दुकान लोकांनी भरलेले होते, अनेक लोक अतिशय उत्साहाने पर्वतारोहणासाठी किंवा पर्वतांच्या परिसरातील सहलीला जाण्यासाठी त्यांना जी खरेदी करायची होती त्याविषयी बोलत होते.

“काय झाले?” फ्रीडाने विचारले. “तुम्ही इतके शांत का आहात?”

हॅन्स यांनी खाली आपल्या हातांकडे पाहिले, त्यांच्या कपाळावर चिंतायुक्त आठ्या पसरल्या होत्या. ते काहीही बोलले नाहीत.

“हे काय? तुम्हाला माहिती आहे ना की तुम्ही मला सांगू शकता.”

"त्याचे कारण तो अकाउंटंट आहे, हेरी इम्होफ." त्यांच्या कपाळावरील आठ्या आणखीनच वाढल्या.

"त्याचे काय?"

"काल रात्री जेव्हा तो इथून परत जात होता, तेव्हा त्याने . . . त्याने मला सांगितले की . . . " हॅन्स यांचा आवाज हळूहळू मंदावत गेला.

"होय? काय सांगितले त्याने तुम्हाला?"

हॅन्सनी निःश्वास सोडला आणि ढेपाळल्यागत ते म्हणाले, "त्याने सांगितले की, आपण कर्जबाजारी होणार आहोत."

"काय?" फ्रीडा म्हणाली. "कसे शक्य आहे ते?"

"ठीक, आपण अजून तरी कर्जबाजारी झालेलो नाही — पण हेरी इम्होफने सांगितले आहे की, *कदाचित* भविष्यात कधीतरी आपण कर्जबाजारी होऊ शकतो! त्याने सांगितले आहे की, आपण आपले दुकान अजून मोठे करायला हवे, आपल्याला ग्राहकांच्या संख्येतही वाढ करावी लागेल आणि निरनिराळ्या तऱ्हेची उत्पादनेही ठेवावी लागतील. तसेच तो असेदेखील म्हणाला की, आपण आतापर्यंत जे काही करत आलो, ते सर्व चुकीच्या पद्धतीने करत आलो आहोत."

त्यांनी आपले डोके गच्च पकडून ठेवले होते, ते पूर्णपणे हताश झाले होते आणि ते अतिशय दुःखी दिसत होते.

फ्रीडाने दुकानात सभोवार नजर फिरवली. दुकानातल्या अरुंद मार्गांमध्ये लोकांची गर्दी झाली होती. लोक हसत होते, बोलत होते, सामान निवडत होते. रजिस्टरजवळ लोकांची रांग तयार व्हायला सुरुवात झाली होती. ती तिच्या पतीकडे वळली.

"ऐकताय ना, मला तुम्हाला एक प्रश्न विचारायचा आहे."

"होय, विचार ना?" हॅन्स अगदी दबलेल्या, खालच्या स्वरात म्हणाले. ते अजूनही त्यांचे डोके धरून बसले होते.

"इतक्या वर्षांपासून हे दुकान आपल्या मालकीचे आहे, होय ना?"

"होय."

“आणि या संपूर्ण कालावधीत आपल्याकडे नेहमीच भरपूर ग्राहक येत होते, होय की नाही?”

“होय.”

“आणि बिलांचा आणि खर्चांचा तुम्ही नेहमीच अगदी काळजीपूर्वक हिशोब ठेवला आहे, होय ना?”

“होय.”

“आणि आपल्याकडे नेहमीच पुरेसे पैसे होते, होय ना?”

“होय.”

“आणि आपण आनंदी होतो?”

“होय, अतिशय आनंदी.”

“तर मग, आता ते काय आहे जे बदलले आहे?”

हॅन्स यांनी आपल्या पत्नीकडे पाहिले. हॅन्सच्या चेहऱ्यावरील दुःखाचे, निराशेचे भाव नाहीसे होऊ लागले होते.

आणि मग ते म्हणाले :

“अकाउंटंट!”

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®। सर्वाधिकार सुरक्षित।